(११)

महाराष्ट्र शासन

**शासन परवानगी आदेश**

क: इंमाशा २०१२/( २१/१२ )/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक: ९ ऑक्टोबर, २०१२

प्रति,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे

**विषय**:- इंग्रजी माध्यमाच्या इ.७ वी पर्यंत सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस इ.८ वी ते १० वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग जोडून कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत

**संदर्भ**:- १) शासन निर्णय, क्र.नमाशा २०१०/(९६/२०१०)/माशि-१, दि.१०.०३.२०१०
२) शासन निर्णय, क्र.नमाशा २०१०/(९६/२०१०)/माशि-१, दि.१४.१०.२०१०
३) संस्थेचा दि.१२/०१/२०१२ चा अर्ज व सर्व संबंधित कागदपत्रे

महोदय,

सोबत जोडलेल्या संस्थेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मिलेनियम एज्युकेशन सोसायटी, सर्वे न.७, पी (१), अशोका सोसायटी मागे, थेरगाव, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०३३ या संस्थेद्वारे संचलित इंग्रजी माध्यमाच्या इ.७ वी पर्यंत सुरु असलेल्या न्यू इंग्लिश मेडियम स्कूल, कैलासनगर, शिवशंभो सोसायटी, थेरगाव, पुणे-३३ येथील प्राथमिक शाळेस जोडून इंग्रजी माध्यमाचे इ.८ वी ते इ.१० वी चे वर्ग कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन स्तरावरुन पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे:-

१) परवानगी आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत संस्थेने राज्यमंडळाकडे संलग्नता प्रमाणपत्राकरिता (प्रथम प्रोव्हिजनल व नंतर रेग्यलुर) अर्ज करणे आवश्यक राहील.
२) सदर परवानगी आदेश राज्य मंडळातर्फे दिल्या जाणा-या संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) आवश्यक असणा-या सर्व निकषांची पूर्तता करणाच्या अधीन राहतील.
३) राज्य मंडळाने संलग्नता प्रमाणपत्राकरिता (रेग्युलर ॲफिलिएशन) निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता न केल्यास सदर परवानगी आदेश रद्द समजण्यात येतील.
४) परवानगी दिलेल्या ठिकाणावरुन सदर शाळेचे स्थलांतर करण्यास परवानगी दिली जाणार नाही.
५) संबंधित शाळेने शासन, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च् माध्यमिक), पुणे व राज्य मंडळ यांच्यातर्फे निर्गमित केल्या जाणा-या सर्व आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
६) परवानगी देण्यात आलेल्या इ.८ वी ते इ.१० वीच्या वर्गामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेला अभ्यासक्रम शिकवणे आवश्यक राहील.
७) "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम-२००९" नुसार प्राथमिक शिक्षण इयत्ता १ ली ते ८ वी असे आहे. सदर अधिनियमातील प्रकरण ४ मधील अनुच्छेद १८ व १९ मधील शाळा मान्यतेबाबतच्या तरतुदींचे पालन संबंधित शाळांनी करणे आवश्यक राहील.
८) परवानगी आदेशाच्या वेळी शाळेत सुरु असलेल्या सर्व वर्गांना या आदेशाद्वारे परवानगी देण्यात येत आहे.

सु. न. जोशी.
(सु.न.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium High School
Thergaon, Pune-411 033

NEW ENGLISH MEDIUM SCHOOL THERGAON PUNE-33.

PRINCIPAL
M. E. S.
New English Medium School
Thergaon, Pune-411 033

Education Secretary
Ashok More

प्रत:
१ शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२ मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव / मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
३ विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग / शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे
४ सचिव, , मिलेनियम एज्युकेशन सोसायटी, सर्वे न.७, पी (१), अशोका सोसायटी मागे, थेरगाव, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०३३
५. निवड नस्ती/माशि-१